**रे.दि.मु.३२४/२०१७**

**निशाणीः ३६ लगत**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ. श्री. सी. पी. कुलकर्णी यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरु...**

मला लिहिता वाचता येते. माझ्या वडिलांना तीन मुले व दोन मुली आहेत. त्यांची नावे प्रभाकर, संजय, सोना व पार्वती असे आहेत. सन २०१७ साली माझी आई हयात नव्हती. माझे भाऊ व बहिण हयात होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा दाखल करण्यासाठी प्रभाकर, संजय, सोना व पार्वती यांनी मला अधिकार पत्र अथवा कुलमुखत्यार पत्र दिलेबाबत मी कोणताही पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात मी माझे नावापुढे ए.कु.मॅ.असे लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे भाऊ व बहिण यांना सदर दाव्याचे कामी सामील केले नाही. मी सदरचा दावा हा माझ्यापुरता दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत ही मुळची शासनाची आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात शासनास वादी अथवा प्रतिवादी केले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, दावामिळकतीत प्रतिवादी यांच्या वडिलांनी यांनी सन १९९७ साली घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे ग्रामपंचायतीला त्या घराची त्यांच्या नावे नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रकांत वसव यांना दोन मुले, दोन मुली व पत्नी असे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना मी या दाव्यात सामील केलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, शासनाने अनेक जणांना घर बांधण्यासाठी शासकीय

जागा दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा सर्वे नंबर ७३२ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना सर्वे नंबर ७३२ मधील प्लॅाट नंबर १५ मधील क्षेत्र शासनाने दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासनाने जे भूखंड दिले ते अटी व शर्तीवर दिले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शासनाने जे भूखंड दिले तेव्हा माझे वडिल दहिवडी गावचे रहिवासी व नागरिक होते याबाबतचा कोणताही पुरावा मी या कामात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासनाने भूखंड दिले तेव्हा दहिवडीमध्ये राहण्यास माझ्या वडिलांना घर नव्हते व राहण्याची कोणतीही सुविधा नव्हती याबाबतचा कोणताही पुरावा मी या कामात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासनाने बेघर लोकांना भूखंड देताना त्या भुखंडामध्ये काय व कसे करायचे याची नियमावली केली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीबाबत प्रांत अधिकारी फलटण यांनी शासनाची नियमावली दिनांक २९/०७/१९८८ रोजी प्रसिध्द केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यात भुखंड मिळाल्यापासून दोन वर्षाच्या आत घर बांधायचे अशी क्रमांक चार येथे अट होती. सदर आदेश दस्तयादी निशाणी क्रमांक ४९ वरील दस्त क्रमांक ०३ आहे. सदर आदेश वादीने मान्य केल्यामुळे त्याला **निशाणी क्रमांक ६०** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रकांत वसव यांचा सुरेश वसव हा भाऊ होता. आता साक्षीदाराला दस्त यादी निशाणी क्रमांक ४९ वरील दस्त क्रमांक ०४ दाखवण्यात आले. सदर दस्त हे दहिवडी येथील वाढीव गावठाण भूखंड धारकांच्या माहितीबाबत तहसिलदार माण, जि. सातारा यांच्या सहीचे प्रमाणित प्रत आहे. त्याला **निशाणी क्रमांक**

**६१** देण्यात येते. सदर भुखंडधारकांच्या माहितीमध्ये सुरेश शंकर वसव यांच्या नावासमोर शेरा या रकान्यात १५ असा उल्लेख केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तामध्ये भूखंड क्रमांक १५ माझे वडील भिवा आवटे यांना दिलेबाबतचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना भूखंड क्रमांक १५ हा दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांनी त्यांच्या हयातीत दावामिळकतीची मोजणी करून घेतली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझे वडील १९८८ साली मयत झाल्यामुळे वादमिळकतीचा ताबा मिळण्यावेळी ते हयात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील त्यावेळी हयात नसल्यामुळे त्यांना वादमिळकतीचा ताबा मिळाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६० वरील आदेशामध्ये भुखंड मिळाल्यापासून भूखंड धारकाने सदर आदेशाच्या तारखेपाससून १५ दिवसाच्या आत मोजणी फी भरली पाहिजे अशी क्रमांक ०९ येथे अट होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी १५ दिवसाच्या आत फी भरली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६० वरील आदेशामध्ये भुखंड मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अटी व शर्ती मान्य आहेत अशी कबुलायत देणे बंधनकारक होते. हे म्हणणे खरे आहे की, तशी कबुलायत माझ्या वडिलांनी दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, भूखंडाच्या फेरबदलाचा अधिकार शासनाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६० वरील आदेशामध्ये अट क्रमांक १० ब मध्ये भूखंडाच्या फेरबदलाचा अधिकार शासनाला असल्याचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, महाराष्ट्र शासनाने वादमिळकत मला दिल्याबाबत माझ्याकडे

कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदाराला सदर कागदोपत्री पुरावा दाखवण्यास सांगितले असता त्याने वादमिळकतीचा निशाणी क्रमांक ०५ वरील सातबारा उतारा दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६० वरील आदेशाची अंमलबजावणी मी किंवा माझ्या वडिलांनी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांना किंवा मला वादमिळकतीची कायदेशीर मालकी नाही. हे म्हणणे खरे नाही की, तलाठी कार्यालयातील महेंद्र खरात हा माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीनी वादमिळकतीत घर बांधल्यापासून ते दावा दाखल करेपर्यंत प्रतिवादी हे वादमिळकतीत वहिवाट करत होते. साक्षीदार पुढे सांगतो की, त्यांनी तेथे भाडेकरून ठेवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीत प्रतिवादी यांचा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९७ साली प्रतिवादीचे वडील चंद्रकांत वसव यांनी वादमिळकतीत घर बांधल्यापासून ते दावा दाखल तारखेपर्यंत मी कोठेही तक्रारी केल्या नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीसह भूखंड क्रमांक १ ते ७४ यांचे अटी शर्तीवर मंजूर झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अटी शर्तीचे पालन ज्यांनी केले त्यांना भूखंडाचे वाटप झाले. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६० वरील अटी शर्ती या त्याच आहेत ज्यांचे पालन करायचे होते. हे म्हणणे खरे नाही की, दहिवडी येथील सर्वे नंबर ७३२ मधील भूखंड क्रमांक १५ याचे मला कायदेशीर वाटप झालेले नाही. याबद्दल मला माहिती नाही की, भूखंड क्रमांक १ ते ७४ मधील भूखंड क्रमांक ५६ मध्ये ओघळ होती. भूखंड क्रमांक ५६ हा चंद्रकांत वसव यांना देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही

की, जेथे ओघळ आहे ती जागा बांधकाम करण्यायोग्य नसते. याबद्दल मला माहिती नाही की, भूखंड क्रमांक ५६ मध्ये ओघळ आहे याबाबतचा अहवाल शासनाला गेला होता.

**प्रश्न:** भूखंड क्रमांक ५६ मध्ये ओघळ असल्यामुळे चंद्रकांत वसव यांनी भूखंड क्रमांक १५ मध्ये म्हणजेच वादमिळकतीमध्ये पूर्वेला तोंड करून १९९७ साली घर बांधले का ?

**उत्तर:** त्यांनी १९९६ साली घर बांधले.

मी सन २०१३ मध्ये सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की, १९९६–९७ पासून मी सेवानिवृत्त होईपर्यंत दहिवडी येथे न्यायालय आहे हे माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१७ पर्यंत वादमिळकतीत चंद्रकांत वसव किंवा त्यांच्या वारसांनी घर बांधले आहे याबाबत न्यायालयात दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी वादमिळकतीत बांधलेले घर भाडयाने दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीतील भूखंडाची मालकी सोडून त्यावरील घराची मालकी ही प्रतिवादीची आहे.

**प्रश्न:** वादमिळकतीत तुम्ही घर बांधले नाही हे बरोबर आहे का ?

**उत्तर:** मला घर बांधण्याची संधी दिली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, १९९६ साली चंद्रकांत वसव यांनी जे घर बांधले आहे ते आजअखेर तेथेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा वापर चंद्रकांत वसव व त्यांच्यानंतर प्रतिवादी करत आहेत. साक्षीदार सांगतो की, ते भाडयाने दिले आहे. मला सदरचे घर कोणाला भाडयाने दिले तसेच कधीपासून दिले व किती भाडे आहे याबद्दल माहिती नाही. हे

म्हणणे खरे नाही की, मी भाडयाबाबतचे कथन खोटे सांगत आहे. सदर दावामिळकतीचे भाडे प्रतिवादी मालक म्हणून घेत आहे. आता साक्षीदाराला दस्त यादी निशाणी क्रमांक २९ वरील दस्त क्रमांक ०१ दाखवण्यात आला. सदरचे दस्त हे उपविभागीय अधिकारी फलटण यांनी दिनांक २४.०२.१९९७ रोजी भिमा आवटे यांना पाठवलेली नोटीस होती. सदरची नोटीस साक्षीदाराला दाखवली असता त्याने ती बरोबर असल्याचे मान्य केले. त्यामुळे त्याला **निशाणी क्रमांक ६२** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे नोटीस माझ्या वडिलांना देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, भूखंड क्रमांक ५६ अ, ५६ब म्हणजे दावा मिळकत भूखंड क्रमांक १५ ही प्रतिवादी व त्यांच्या कुटूंबाच्या ताब्यात होती व आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत चंद्रकांत वसव यांना वाटपात आली होती.

**प्रश्न:** तुम्ही मुदतीत दावा केला नाही ?

**उत्तर:** मला संधीच मिळाली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मला सन १९९६ पासून न्यायालय, महसूल विभाग, पोलीस विभाग याबाबतची माहिती होती व माझे जाणे येणे होते. हे म्हणणे खरे नाही की, मला संधी मिळाली नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी वादमिळकतीतील त्यांच्या घरात विदयुत कनेक्शन घेतलेले आहे. आता साक्षीदाराला दस्त यादी निशाणी क्रमांक ५७ वरील दस्त क्रमांक ०१ दाखवण्यात आले. सदरचा दस्त हा मंडलअधिकारी दहिवडी यांचा दिनांक २६.०८.१९९६ चा आदेश असून त्यावर अनुक्रमांक ०८ ला वादीचे वडील भिमा आवटे यांचे नाव असल्याचे वादीने मान्य केले. सदरचा दस्त

हा छायांकित प्रत असल्यामुळे त्याला निशाणी देता येत नाही.

**प्रतिवादी यांचे वकिलांच्या तोंडी विनंतीवरून व मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

माझ्या समक्ष,

सही/–

दिनांकः१३/०१/२०२५.

ठिकाणः दहिवडी.

(एस. एस. गाडवे)

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर दहिवडी.